दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ८० वा मंगळवार दि.२७ ऑगस्ट २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## समदर्गा येथे महिला भवन बांधकामासाठी आ.कराड यांच्याकडून २० लाखाचा निधी

लातूर : – लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भादा सर्कल मधील मौजे समदर्गा येथे बचत गट व इतर महिलांच्या कामाकरिता सुसज्ज अद्यावत महिला भवन बांधकामासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी तब्बल २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. सदरील निधी दिल्याबद्दल आणि महायुती शासनाने लाडक्या बहिणींना राखी पौर्णिमेची भेट दिल्याने आ. कराड यांचे महिलांनी स्वागत करून आभार व्यक्त केले.

राज्यातील महायुती शासनाने सुरू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेअंतर्गत अनेक महिलांना शासनाच्या वतीने तीन – तीन हजार रुपयांचा निधी बँक खात्यात जमा झाल्याने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भादा सर्कल मधील मौजे समदर्गा येथील महिलांनी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा रविवारी यथोचित सत्कार करून व राखी बांधून आभार व्यक्त केले. यावेळी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, भाजपा पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, जिल्हा उपाध्यक्ष पद्माकर चिंचोलकर, संभाजी वायाळ, उद्धव काळे, रवींद्र पाटील, दिगंबर तिडके यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात राज्यातील महायुती शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण यासह विविध कल्याणकारी योजना सुरू करून गोरगरीब जनतेला दिलासा दिला असल्याचे सांगून समदर्गा गावातील अमरजा श्रीपाद ढोक, सुवर्णा जगन्नाथ ढोक, छाया हेमाद्रीपंत काळे, कौशल्या विष्णू ठोक, रेणुका शिवाजी काळे, वर्षाला हरिबा महाडक, कुसुम राम काळे या महिलांनी आ रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून गावागावात होत असलेल्या विविध विकास कामाचे कौतुक केले. अवैद्य दारू विक्री बंद करावी, महिलांसाठी महिला भवन बांधून देण्यात यावे, सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देऊन उत्पादित मालाच्या विक्रीसाठी मदत करावी गावातील विविध मंदिरासमोर सभागृह द्यावे अशी मागणी महिलांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केली.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, समदर्गा गावातील दारूबंदीसाठी पोलीस प्रशासनास सूचना दिल्या. सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी सेंद्रिय शेतीच्या




मालांना मार्केट मिळावे यासाठी प्रशासनाकडे निश्चितपणे प्रयत्न केले जातील अशी ग्वाही देवून समदर्गा येथील महिलांसाठी सुसज्ज व अद्यावत महिला भवन बांधकामासाठी २० लाख रुपयाचा निधी देण्यात येत असल्याचे घोषित केले.

देशाचे यशस्वी पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या नेतृत्वातील केंद्र शासनाने आणि राज्यातील महायुती शासनाने सुरू केलेल्या विविध योजनेची सविस्तर माहिती देऊन माहिती देऊन या योजना या पुढील काळातही कायमपणे सुरू ठेवण्यासाठी राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे शासन सत्तेवर येणे गरजेचे आहे तेव्हा महिलांनी पुढाकार घेऊन महायुतीच्या विजयासाठी मेहनत घ्यावी असे आवाहन आ. रमेशआप्पा कराड केले.

याप्रसंगी आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थी महिलांना सन्मान पत्राचे वाटप करण्यात आले त्याचबरोबर महिला भवन बांधकामासाठी देण्यात येणाऱ्या निधीचे पत्रही महिलांकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी मौजे समदर्गा येथील सरपंच देवकन्या काळे, विमलबाई ढोक पल्लवी गोमदे, स्वाती काळे, निर्मला तिडके, पार्वती म्हेत्रे, गीतांजली तिडके, ज्योती सुरवसे, सुलोचना सुरवसे, मनीषा ढोक, शशिकला गवळी, जनाबाई ढोक, लक्ष्मी ढोक, गीता काळे, सुचिता काळे, सपना गौर, सुनिता ढोक, मीरा सुरवसे यांच्यासह बहुसंख्य महिला उपस्थित होत्या.

## थोर महापुरुषांचे विचार घराघरात नव्हे प्रत्येकाच्या मनामनात रुजले पाहिजेत

### जयंती सोहळ्यात भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांचे प्रतिपादन

लातूर : – साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्यासह अनेक मान्यवर थोर पुरुषांनी समाजाला दिशा देण्याचे मोठे कार्य केले आहे. एक दिवसापुरती त्यांची जयंती साजरी करून चालणार नाही खऱ्या अर्थाने थोर पुरुषांचे विचार प्रत्येकाच्या घराघरात आणि मनामनात रुजले पाहिजेत असे प्रतिपादन भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केले.

रेणापूर तालुक्यातील मौजे खरोळा येथे लोकशाहीर साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहाच्या वातावरणात रविवारी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते ऋषिकेशदादा कराड बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच धनंजय देशमुख हे होते तर याप्रसंगी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, भाजपा पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव, रेणा कारखान्याचे उपाध्यक्ष अनंतराव देशमुख, माजी सभापती शिवराज सप्ताळ, विश्वासराव देशमुख, राष्ट्रवादीचे बालाजी कदम, विलास भोसले सुनील सौदागर महादू रसाळ, राजकुमार मानमोडे, गजू अण्णा राऊतराव, बाबनसाब शेख, सुरेश जाधव, धर्मराज करमुडे, विश्वनाथ कागले, राहुल कांबळे, जगन्नाथ ढवळे, जगन्नाथ धबडगे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

दीड दिवसाचे शिक्षण घेऊन साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे





यांनी फकीरासह अनेक कादंबऱ्याचे लेखन केले त्यांची अनेक कथा, पोवाडे, काव्य आजही अनेकांच्या मनावर अधिराज्य करीत आहेत असे सांगून यावेळी बोलताना ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, ज्या समाजात आपण जन्मलो त्या समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून प्रत्येकाने जयंतीच्या निमित्ताने विधायक कामाचा जनसामान्यांच्या हिताचा संकल्प करून तो पुर्तीस घेऊन जावे असे बोलून दाखवले.

राज्यातील महायुती शासनाने विविध जनहिताच्या लोककल्याणकारी योजना सुरू केले आहेत नव्यानेच सुरू झालेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा प्रत्येक माय माऊलींनी अर्ज दाखल करून लाभ घ्यावा. ज्यांचे अर्ज अपात्र झाली आहेत अशा महिलांचेही अर्जांना मंजूर देण्यासाठी प्रयत्नशील आहोत लाडकी बहीण ही योजना तुमची आहे तुम्हाला मिळणारा पैसा हाही तुमचा आहे त्यामुळे या योजनेपासून एकही महिला लाभार्थी वंचित राहणार नाही यासाठी मी या योजना समितीचा लातूर ग्रामीण अध्यक्ष या नात्याने कार्यरत आहे असेही भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी बोलून दाखवले.

या कार्यक्रमात सरपंच धनंजय देशमुख यांनी प्रास्ताविक केले जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव यांनी अण्णाभाऊंच्या कार्यावर प्रकाश टाकला. प्रारंभी उत्सव समितीच्या वतीने युवराज धबडगे, नारायण कदम, गोविंद कदम, देविदास गायकवाड, पुंडलिक धबडगे, राजू कांबळे, भरत कदम, कल्याण अविनाश धबडगे, गोविंद उमाप, आदित्य कदम, राजू कदम, ज्ञानोबा कदम, मारुती धबडगे, अवधूत उपाडे, शिवप्रसाद कदम, यांच्यासह अनेकांनी उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे यथोचित सत्कार करून स्वागत केले. कार्यक्रमास खरोळा आणि परिसरातील सर्व स्तरातील नागरिक समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'लाडकी बहीण' साठी आदिवासींचे बजेट वापरले?

मुंबई : प्रतिनिधी विधानसभेत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना गेमचेंजर ठरेल, असा महायुतीच्या नेत्यांना विश्वास आहे. तर, राज्य सरकारकडे निधीच नसल्याचा आरोप विरोधक करत आहेत. यामध्ये आदिवासींचे बजेट 'लाडक्या बहीण' योजनेसाठी वर्ग केले का? असा सवाल वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. आदिवासींचे बजेट सात टक्के आहे. म्हणजे ते ७० कोटी होते. लाडकी बहीण योजनेला कुठून पैसे आले? आदिवासींच्या बजेटचे ७ हजार कोटी लाडकी बहीण योजनेसाठी वर्ग केले का, असा सवाल



आंबेडकर यांनी सरकारला विचारला आहे. आदिवासींचे बजेट आदिवासींवर खर्च करण्याचे संविधानाचे बंधन आहे. आदिवासी बजेटमध्ये कशाकशावर खर्च केला याचे विवरणपत्र काढावे, असे आवाहन प्रकाश आंबेडकर यांनी शिंदे सरकारला केले. दहा हजार कोटी आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी ठेवले पाहिजेत. दुर्दैवाने सरकारला आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जाणीव नाही, असा आरोप देखील आंबेडकर यांनी केला.

## लातूर ग्रामीणमधील रस्त्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी आमदार धिरज देशमुख यांची जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक

**पानगाव ते खरोळा पाटी, बोरगाव ते मुरुड अकोला रस्ता प्राधान्याने होणार; प्रशासन व स्थानिक नागरिक यांची कोअर कमिटी स्थापन होणार**

लातूर/प्रतिनिधी लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी पानगाव ते खरोळा पाटी, बोरगाव ते मुरुड अकोला रस्ता या रस्त्यांचा प्रश्न प्राधान्याने सोडवा, अशी मागणी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत केली. त्यानंतर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी प्रशासन व स्थानिक नागरिकांची कोअर कमिटी स्थापन करून पानगाव ते खरोळा पाटी रस्त्याच्या कामाला गती द्या. शेतकऱ्यांची सहमती असलेल्या ठिकाणचे काम तात्काळ सुरू करा. बोरगाव – मुरुड अकोला रस्त्याच्या तांत्रिक अडचणी दूर करून रस्त्याचा प्रश्न निकाली काढा, अशा सूचना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या उपस्थितीत विविध विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक सोमवारी, दि. २६ रोजी घेण्यात आली. यावेळी उपजिल्हाधिकारी सुनीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, रेणापूरच्या तहसीलदार मंजूषा भगत यांच्यासह कृषी, परिवहन आदी विभागांचे अधिकारी, विमा कंपनीचे प्रतिनिधी व दूरदृश्य प्रणालीद्वारे राष्ट्रीय महामार्गाचे कार्यकारी अभियंता प्रवीण सुमंत उपस्थित होते. आ. धिरज देशमुख म्हणाले, लातूर ग्रामीण मतदारसंघातील पानगाव ते खरोळा पाटी रस्त्याचे काम लवकरात लवकर होऊन दळणवळण सुरळीत व्हावे. स्थानिक नागरिक व प्रवाशांची






गैरसोय थांबावी. मी वेळोवेळी बैठका घेऊन यासाठी पाठपुरावा केला आहे. हा रस्ता अपुर्ण राहिल्यास आपल्या भागाचे दूरगामी नुकसान होत आहे. यासाठी हा रस्ता कामाच्या निश्चित कालमर्यादेत पुर्ण होणे गरजेचे आहे. प्रशासनाने स्थानिक नागरिक व प्रशासन यांच्यात योग्य समन्वय साधून रस्त्याचे काम पूर्ण करावे. लातूर – टेंभूर्णी महामार्गावरील बोरगाव ते मुरुड अकोला व मुरुड अकोला ते येडशी या रस्त्याच्या कामाचाही निर्णय तातडीने होणे गरजेचे आहे. रस्त्याची दुरवस्था, वाहतूक वर्दळ, स्थानिकांची मागणी व आंदोलन याचा विचार करून या रस्त्याच्या कामातील तांत्रिक अडचणी दूर करून हा प्रश्न मार्गी लावावा.

शेतकऱ्यांना विमा, दुष्काळ निधी द्या

लातूर ग्रामीण मतदारसंघातील विमाधारक शेतकऱ्यांना विमा कंपनीने किरकोळ त्रुटी दाखवत विमा अनुदान नाकारले आहे. त्यामुळे कृषी विभाग व विमा कंपनीने त्या किरकोळ त्रुटी दूर करीत नुकसान भरपाईस पात्र विमाधारक शेतकऱ्यांना विमा अनुदान द्यावे. प्रशासन व विमा कंपनीद्वारे करण्यात येणारे पंचनामे व नोंदी यातील त्रुटीमुळे भविष्यात तणाव निर्माण होणार नाही, याची शासनाने दक्षता घ्यावी. तसेच, मागील वर्षी रेणापूर तालुका १०० टक्के दुष्काळी घोषित करण्यात आला असून येथील काही शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदानाचा लाभ मिळाला नाही. यातही तांत्रिक चुकांमुळे अनुदानापासून कोणीही वंचित राहणार नाही, याची काळजी घ्यावी, अशी मागणी आ. धिरज देशमुख यांनी केली. सध्या पावसाळा सुरू असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची एसटी बसेसअभावी गैरसोय होत असून मागणी असलेल्या गावात कायमस्वरूपी एसटी बसेस सुरू करावी, थांबे घ्यावेत, अशीही मागणी केली.

जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या तत्काळ सूचना

पानगाव ते खरोळा रस्ता पुर्ण करण्यासाठी प्रशासन व स्थानिक नागरिकांची कोअर कमिटी स्थापन करून कामाला गती देऊ. तसेच या रस्त्याला शेतकऱ्यांची सहमती असलेल्या ठिकाणचे काम तात्काळ सुरू करा. बोरगाव – मुरुड अकोला रस्त्याच्या तांत्रिक अडचणी दूर करून रस्त्याचा प्रश्न निकाली काढण्याच्याही सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या. शेतकरी व प्रशासनाच्या चुकांमुळे विमा व दुष्काळी अनुदानापासून वंचित शेतकऱ्यांच्या नुकसान अर्जांची पुनर्तपासणी करून पात्र शेतकऱ्यांना लाभ द्या. ढगफुटीच्या कारणाने पीकविमा नाकारलेल्या शेतकऱ्यांचे वैयक्तिक पंचनामे करून त्यांना लाभ द्या. जेथे मागणी असेल तेथे बससेवा सुरू करण्याची कार्यवाही करावी, असेही जिल्हाधिकारी यांनी सूचना दिल्या.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# शांततेचा संदेश

तिसर्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर भविष्यकालीन कामांचा आराखडा जनतेपुढे मांडताना नरेंद्र मोदी यांनी जगात भारताचे स्थान आणखी बळकट करेन, असे म्हटले होते. भारत युद्धखोर नाही. जगाला युद्धाच्या खाईत ढकलून देण्याची भारताची प्रवृत्ती नाही. उलट भारत विश्वकल्याणासाठी कार्यरत राहिला आहे आणि राहील, असे मोदी यांनी लाल किल्ल्यावरून राष्ट्राला संबोधित करतानाही म्हटले होते. लोकसभा निवडणुकांनंतर सरकार सत्तेवर आल्यावर मोदी यांनी पोलंड आणि युक्रेनचा ऐतिहासिक दौरा केला असून, दौर्यात जागतिक शांततेसाठी भारताच्या नेतृत्वाची कशी गरज आहे, हे त्या देशाच्या प्रमुखांच्या लक्षात आले असेल. पोलंडच्या दौर्यात मोदी यांनी त्या देशाचे पंतप्रधान डोनाल्ड टस्क यांच्याशी वाटाघाटी करून, उभय देशांतील व्यूहरचनात्मक संबंध अधिक घट्ट करण्याचा निर्धार केला. वॉर्सा येथील कोल्हापूर स्मारकास भेट देऊन मोदी यांनी मानवंदना दिली. दुसर्या महायुद्धाच्या वेळी विस्थापित झालेल्या पोलिश महिला आणि मुलांना कोल्हापूरच्या राजघराण्याने आश्रय देऊन त्यांना सन्मानाने जगता येईल, याकडे लक्ष दिले, असे मोदी म्हणाले. मोदी यांच्या दौर्यामुळे भारत व पोलंडमधील जुन्या संबंधांच्या आठवणींना उजाळा मिळाला. रशिया-युक्रेन युद्ध संपवण्यात मोदी यांची भूमिका निर्णायक राहील, अशी आशा टस्क यांनी व्यक्त केली. भारत-पोलंडमधील राजनैतिक संबंधांना ७० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने पोलंडला मोदी गेले होते. गेल्या ४५ वर्षांत भारतीय पंतप्रधानांनी पोलंडला जाण्याची ही पहिलीच वेळ होती. या पहिल्याच दौर्यात मोदी यांनी पोलंडमधील जनतेची मने जिंकली. शीतयुद्धापूर्वी पोलंड हा सोव्हिएत युनियनच्या प्रभावाखाली होता. युरोपियन युनियनप्रमाणेच आंतरराष्ट्रीय जगतात भारताचे स्थान काय आहे, याची कल्पना पोलंडला आलेली आहे. रशिया-युक्रेन युद्धामुळे युक्रेनची हवाई सीमा बंद असल्याने, पोलंडमधून मोदी रेल्वेने १० तासांचा प्रवास करून कीव्हला गेले. दीड महिन्यापूर्वी मोदी रशियाच्या दौर्यावर गेल्यानंतर, अमेरिकेसह अन्य पाश्चात्त्य देशांनी तसेच युक्रेनचे अध्यक्ष व्लोदिमीर झेलेन्स्कींनी जाहीरपणे नापसंती व्यक्त केली होती. या पार्श्वभूमीवर यावेळी रशिया-युक्रेन युद्धात मृत्युमुखी पडलेल्या मुलांना मोदी यांनी श्रद्धांजली वाहिली. मृत मुलांची माहिती देणारे प्रदर्शन पाहून ते काही काळ स्तब्ध झाले आणि त्यांनी झेलेन्स्कींच्या खांद्यावर हात ठेवून त्यांना दृढालिंगन दिले. युद्धग्रस्त युक्रेनच्या पाठीशी भारत असल्याची भावनाही मोदी यांनी प्रभावीपणे मांडली. 'मोदीजी ने वॉर रुकवा दी और फिर हमारी बस निकली,' असे केंद्र सरकारच्या जाहिरातीत असलेल्या एका तरुणीच्या तोंडातील शब्द होते. लोकसभा निवडणूक काळात या जाहिरातीवरून विरोधकांनी सत्तारूढ पक्षाला खूप ट्रोल केले होते; पण खुद्द परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी यामध्ये तथ्य असल्याचे सांगितले होते. ज्यावेळी खार्किव्हमध्ये रशियाकडून गोळीबार सुरू होता आणि भारतीय तरुण रेल्वेस्थानकातून बाहेर पडू शकत नव्हते, तेव्हा मोदी यांनी पुतीन यांना फोन केला आणि गोळीबार थांबवण्याची विनंती केली. त्यानंतर पुतीन यांनी लष्कराला सूचना दिल्या. मग विशिष्ट भागात काही काळ युद्धविराम करण्यात आला, अशी माहिती जयशंकर यांनीच दिली होती. गेल्या अडीच वर्षांपासून रशिया-युक्रेन युद्ध सुरू आहे. गेल्या ३० वर्षांत युक्रेन दौर्यावर जाणारे मोदी हे भारताचे पहिलेच पंतप्रधान आहेत. युक्रेनमध्ये बनणार्या आर-२७ क्षेपणास्त्रांचा वापर आज भारत करत आहे. हवेतून हवेत वार करण्यासाठी ते उपयुक्त आहे. इंडियन एअरफोर्सच्या लढाऊ जेटमध्ये या क्षेपणास्त्राचा वापर केला जातो. युक्रेन स्वतंत्र झाल्यापासून उभय देशांमध्ये संरक्षण सहकार्य सुरू आहे. दोन्ही देशांत आधीच ७ कोटी अमेरिकन डॉलरचे चार संरक्षण करार झाले आहेत. भारताला एएन-१७८ विमान देण्याचेही संकेत युक्रेनने दिले आहेत. मोदी रशियाच्या दौर्यावर असताना ८ जुलै रोजी पुतीन यांनी युक्रेनवर क्षेपणास्त्रांचा भीषण हल्ला केला होता. यादरम्यान एका बालरुग्णालयावरही क्षेपणास्त्र पडले होते. त्याचवेळी मोदी व पुतीन यांनी परस्परांना अभिवादन करत स्मितहास्य केले होते. 'जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचे नेते आणि एक रक्तरंजित गुन्हेगार यांचे आजच्या दिवशी आलिंगन पाहणे, हे निराशाजनक आहे,' असे ट्विट तेव्हा झेलेन्स्की यांनी केले होते; पण त्याचवेळी बंदुका आणि बॉम्बच्या माध्यमातून संघर्ष थांबत नसतो, तर कायम संवादाच्या माध्यमातूनच तो संपतो, असा सल्ला मोदी यांनी पुतीन यांना दिला होता, हे झेलेन्स्कींनी लक्षात घ्यायला हवे होते. आता 'तुम्ही पुतीन यांच्याबरोबर वाटाघाटी करा. शांतता निर्माण करण्यासाठीच्या प्रयत्नांसाठी भारत सहकार्य करेल,' असे आश्वासन मोदी यांनी झेलेन्स्कींना दिले आहे. युक्रेनचे सार्वभौमत्व आणि भौगोलिक एकात्मता कायम राखण्याबाबत भारताने निःसंदिग्ध शब्दांत समर्थन दिलेले आहे. मोदी यांच्या युक्रेन भेटीतून काही महत्त्वाच्या गोष्टी साध्य झाल्या आहेत. युरोपमध्ये शांतता प्रस्थापित करण्यात भारताची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले आहे. रशियाच्या युक्रेनवरील आक्रमणामुळे जी जागतिक उलथापालथ झाली आहे, त्यातून सावरण्यासाठी भारताचा सल्ला घेण्याची गरज असल्याचेही यातून ध्वनित झाले आहे. सोव्हिएत युनियन कोसळल्यानंतर २४ ऑगस्ट १९९१ रोजी युक्रेन स्वतंत्र झाला. गव्हाचे कोठार असलेल्या युक्रेनबरोबर चांगले संबंध प्रस्थापित करणे, हे मोदी यांच्या भेटीमुळे शक्य झाले आहे. भारताने युक्रेनचे दुःख समजून घेण्यामुळे, युद्धापासून फटकून राहणार्या व रशिया-युक्रेन युद्धाबाबत तटस्थ असणार्या ग्लोबल साऊथ पट्ट्यातील देशांना (आफ्रिका, लॅटिन अमेरिका, कॅरेबियन व आशियाई देश) खात्रीने तेथील शांतता प्रक्रियेत सहभागी व्हावेसे वाटेल. या संघर्षात भारत बघ्याची भूमिका घेणार नाही, हे मोदी यांनी स्पष्टपणे सूचित केले आहे. सामरिकदृष्ट्या तसेच कच्च्या तेलाबाबत भारताला रशियाची गरज आहे; पण त्याचवेळी भारताने शांततावादी वारसा सोडलेला नाही. ही बुद्धाची भूमी असून, आम्ही शांततेचा संदेश जगभर पोहोचविणार आहोत, हेच मोदी यांनी युक्रेन दौर्यातून दाखवून दिले आहे.

# १४० कोटीचा देश, ११७ खेळाडू आणि ६ पदके!

नुकत्याच (२०२४) फ्रांस ची राजधानी पॅरिस येथे ऑलंपीक स्पर्धा पार पडल्या.जगातील २०० पेक्षा जास्त देश आणि त्या देशातील दहा हजार सातशे खेळाडूंनी सहभाग नोंदवला. प्रत्येक देशाच्या खेळाडूने खेळात आपल्या अंगी असलेले कौसल्य दाखवून आपआपल्या देशासाठी कसे जास्तीत जास्त पदकं मिळतील,त्यातही सुवर्ण पदकं कसे जास्त मिळतील यासाठी आपल्या अंगी असलेले पुर्ण कौसल्य पणाला लावले, आणि आपआपल्या देशासाठी सुवर्ण,सिल्वर,ब्रांझ पदक जिंकले. खेळाचा समारोह झाला आणि कोणत्या देशाने किती पदके जिंकली, सुवर्ण किती, सिल्वर किती, आणि ब्रांझ किती त्याची यादी प्रसिद्ध झाली. त्या यादीत भारत देश पिछाडीवर दिसला. तेव्हा विचार आला. एक आश्चर्य वाटले की, भारतापेक्षा किती तरी लोकसंख्येने,व क्षेत्रफळाने लहान असणाऱ्या देशाने कितीतरी सुवर्ण पदक जिंकले,जवळपास लहानमोठ्या ६३ देशाने सुवर्ण पदकं जिंकले, बाकी सिल्वर,ब्रांझ हे पदक जिंकले ते वेगळे.आणि भारत १४० कोटींचा देश असताना फक्त सहा पदक जिंकलेआणि ते ही एक सिल्वर,पाच ब्रांझ! किती लाजीरवाणी गोष्ट आहे. जग कोणत्या दृष्टीने पाहत असेल आपल्याकडे,काय विचार करत असतील आपल्या देशाबद्दल,आपले पंतप्रधान अमेरिकेत जाऊन सांगतात, भारत तरुणांचा देश आहे. मग एवढा मोठा तरुणांचा देश असतांना ११७ च खेळाडू देशात सापडतात हेही एक आश्चर्यकारकच आहे.अमेरिकेची लोकसंख्या ३३ कोटी आहे,त्या देशाचे ५९२ खेळाडू सहभागी झाले होते.१२६ पदके जिंकली त्यात४० सुवर्ण पदक जिंकले. फ्रांसची लोकसंख्या ६कोटी ६५लाख, खेळाडू होते ५७३, पदक जिंकले ६४ त्यात १६ सुवर्ण, इंग्लडची लोकसंख्या ७कोटीच्या आसपास आहे,खेळाडू होते ३२७, पदक जिंकले ६५ त्यात१४ सुवर्ण.चायनाची लोकसंख्या १४४ कोटी खेळाडू होते ३८८,पदक जिंकली ९१त्यात४० सुवर्ण पदक.जर्मनीची लोकसंख्या ८कोटी ४५ लाख, खेळाडू होते ४२८,पदके जिंकली ३३ त्यात १२ सुवर्ण.इटलीची लोकसंख्या ६ कोटी, खेळाडू ४०३,पदक जिंकली ४० त्यात १२ सुवर्ण. जापानची लोकसंख्या १२ कोटी, खेळाडू होते ४०४,पदके ४५जिंकले, त्यात २० सुवर्ण. द.कोरीयाची लोकसंख्या ५ कोटी ३२ पदके जिंकली त्यात १३ सुवर्ण.ऑट्रेलियाचे ४६० खेळाडू,५३पदके जिंकली,त्यात १८ सुवर्ण.लोकसंख्येने कमी असलेल्या देशांनी जर चारशे,चारशे खेळाडू उतरवले तर १४० कोटी च्या देशात चारशे खेळाडू असायला पाहिजे नव्हते काय?. आपल्या देशातील तरुण खेळात तरबेज नाहीत का? इथल्या तरुणांना खेळात रस नाही का? त्यांना देशासाठी खेळावं असे वाटत नाही का? त्यांना पण खेळावं वाटते, त्यांना पण खेळात रस आहे.त्यांना देशाला सुवर्ण पदक जिंकून द्यावे वाटतात. पण त्यांना संधी मिळेल तेव्हाच ना! आपल्या देशात पण खूप चांगले खेळात प्रविण खेळाडू आहेत. पण त्यांना जाणूनबुजून डावलल्या जाते अशी परिस्थिती आहे. आणि या डावलल्याच कारण म्हणजे जात! जातीव्यवस्थेचे निर्मुलन या पुस्तकात डॉ बाबासाहेब आंबेडकर लिहितात आपली प्रचलित समाज रचना बदलल्याशिवाय आपली प्रगती शक्य नाही. आपण कोणत्याही दिशेला वळा जात हा महाकाय राक्षस आपल्या प्रगतीच्या मार्गात आडवा येणारच. या राक्षसाचा खातमा केल्याशिवाय आपण कोणतीही सुधारणा करु शकणार नाही. कारण जातीच्या पायावर काहीही उभारल्या जाऊ शकत नाही. तुम्ही राष्ट्र उभारु शकत नाही. तुम्ही नैतिकता उभारु शकत नाही. जातीच्या पायावर काहीही उभारण्याचा प्रयत्न केला तर त्याला तडेच जातील ते एकजीव असणार नाही.

म्हणून सर्वात पहिले आमच्या देशात असणारा जात नावाचा राक्षस आम्हाला जाळावा लागेल. तो ही राष्ट्रीय पातळीवर त्याची होळी करावी लागेल,की जळताना तो सर्व देश पाहिल. अमेरिकेने त्यांच्या देशात असलेला काळा आणि गोरा हा वर्णभेद काही वर्षांतच मिटवला.आणि म्हणून कृष्णवर्णीय बराक ओबामा अमेरिकेचा दोन वेळा राष्ट्राध्यक्ष झाला. म्हणून तो देश जगात महासत्ता आहे. युरोप खंडातील खूप साऱ्या देशांनी त्यांच्या देशात असलेला जातीवाद संपवला. म्हणून ते देश आज प्रगतीपथावर, व बलशाली आहेत. एकदा जपानचे पंतप्रधान युरोप खंडातील दौऱ्यावर गेले असता, त्यांनी ते युरोपातील प्रगती पाहीली. त्यांनी विचारले युरोपियन देशांनी एवढी प्रगती कशी केली. त्यांना समजले की, युरोपियन देशांनी तेथे असलेला जातीवाद संपवला म्हणून ते देश प्रगतीपथावर गेले. तेव्हा जापानने सुध्दा त्यांच्या देशात असलेला जातीवाद संपवला.सर्वांना दर्जेदार शिक्षणाची द्वारे खुली केली. कारण शिक्षणाने माणूस ज्ञानी,बुध्दीमान होतो.त्या ज्ञानाच्याद्वारे डोक्यात असलेल्या कल्पना,आयडिया,प्लान,निर्माण करतो.ते देशहितासाठी उपयोगाच्या आहेत.हे जापान च्या लक्षात आले. आणि म्हणून एका आदीवासी मुलीसाठी ट्रेन सुरु ठेवणारा एकमेव जापान देश आहे.आज जपान जगाच्या पाठीवर प्रगतशील देश आहे. आपले पंतप्रधान तर साडेआठसे कोटीच्या विमानाने अब्ज रुपये खर्च करुन अख्ख जग फिरुन आले. मग त्यांना तेथील प्रगती दिसली नाही का? तेथे संपलेला जातीवाद तेथे असणाऱ्या टेक्नोलॉजी, तेथील शिक्षणपद्धती, तेथील रस्ते, तेथील खेळ, खेळाडू. व्यवसाय,शेती याचा काहीही आदर्श घेतलेला दिसला नाही. आज आम्ही स्वतंत्र होऊन ७८ वर्ष झाले, विद्यार्थी दशेत विद्यार्थ्यांना दर्जेदार स्वरुपाच्या शाळा, कॉलेज त्यामध्ये जो विद्यार्थी ज्या खेळात प्रविण असेल, त्याच्यामध्ये आणखी खेळाची आवड निर्माण व्हावी.त्या खेळात तो अधिकाधिक प्रविण व्हावा,देशात खेळाडू निर्माण होतील त्यासाठी ज्या सुविधा उपलब्ध करुन द्यायला पाहिजे त्या आम्ही करु शकलो नाही. खेळाची मैदान, त्या मैदानावर खेळवण्यासाठी साधन, साहित्य आम्ही उपलब्ध करुन देऊ शकलो नाही. काही खेळ असे आहेत की ते आपल्याला माहीत पण नाहीत.ते खेळणे तर दुरच.

*************

विनोद सरदार
फुले आंबेडकर विद्वत सभा
मो.नं ९६८९८४७११५

# विश्वकर्मीय सुतार समाजातील नेत्यांनी ओबीसींच्या लढाईत उतरावे!

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज नेत्यांनी आपल्या निष्ठावंत हजारो कार्यकर्त्यांना सोबत घेऊन राज्याच्या मध्यवर्ती ठिकाणी ओबीसी आरक्षण बचाव साठी आमरण उपोषण करावे.सद्यस्थितीत राज्यात ओबीसी आरक्षणाचा विषय चांगलाच तापलेला असून राज्यातील प्रत्येक ओबीसी संघटना आणि ओबीसी नेते आपापल्या परीने ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत आहेत काही ठिकाणी ओबीसी नेते आणि विविध पातळीवरील पदाधिकारी कार्यकर्ते विविध पध्दतीने ओबीसी संदर्भात समाज जागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत तर काही ठिकाणी उपोषणाचा कार्यक्रम आयोजित करीत आहेत अशा वेळी विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज हा संवैधानिक दृष्टीने ओबीसी प्रवर्गातील एक महत्वाचा ओबीसी घटक असतांना ओबीसी म्हणून विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजातील स्वतःला ओबीसी सुतार समाजाचे नेतृत्व समजणाऱ्या सर्वच तथाकथित स्वयंघोषित नेत्यांनी मग ते नेतेगिरी करणारे मुरब्बी, दिग्गज,मातब्बर अनुभवी असो अथवा धडाकेबाज जिगरबाज युवक नेतृत्व असो अशा सर्वच ओबीसी सुतार समाज नेत्यांनी ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठीच्या लढाईत ओबीसी सुतार समाजाचे नेतृत्व म्हणून नैतिक जबाबदारीने उतरणे गरजेचे आहे.

विश्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात ज्यांनी ज्यांनी गतकाळात समाज नेतेगिरीचे सोशल मीडियावर सुंदर छान छान फलक झळकवून नेतेगिरीचा मोठेपणा मिळविला असेल,समाज नेतेगिरीची भन्नाट तुफान प्रसिद्धी मिळविली असेल आणि सद्यस्थितीत समाजात जे जे स्वतःलाच आख्या विश्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजाचे कर्तृत्ववान कार्यसम्राट कर्तबगार समाज नेतृत्व समजत असतील त्या सर्वच समाज नेत्यांनी आपापल्या निष्ठावंत सहकारी मित्रांसोबत राज्यातील मध्यवर्ती ठिकाणी ओबीसी आरक्षण बचाव आमरण उपोषण करावे त्या उपोषणात मी सर्वसामान्य ओबीसी सुतार समाज बांधव म्हणून निश्चितच सहभागी होतो.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात नेतेगिरी करणाऱ्या सर्वच नेत्यांनी मग संबंधित नेतेगिरी करणारे दिग्गज मातब्बर असो अथवा धडाकेबाज कर्तृत्ववान युवक नेतेमंडळी असो या सर्वच नेत्यांनी संपूर्ण राज्यात ओबीसी आरक्षण संदर्भात चैतन्य निर्माण करावे आणि आपापल्या धडाकेबाज नेतृत्वाखाली संपूर्ण राज्यातील कानाकोपऱ्यात ओबीसी आरक्षण संदर्भात समाज जागृती निर्माण करण्यासाठी ठिकठिकाणी ओबीसी समाज जागृती मेळाव्याचे भव्यदिव्य मेळाव्याचे आयोजन करावे आणि लाखोंच्या संख्येने समाज बांधवांना एकत्रित करून आपापल्या ज्ञानाचा ज्ञान भांडार खुला करून जमलेल्या लाखोंच्या उपस्थित समुदायाला मंत्रमुग्ध करावे आपला ज्ञानाचा ज्ञान भांडार खुला करावाजेणेकरून समाजात ओबीसी,आरक्षण इत्यादी विषया संदर्भात नवचैतन्य निर्माण होईल.



आजपर्यंत गेली अनेक वर्षांपासून गतकाळात विविध पातळीवर अनेक सुतार समाज बांधवांनी विश्वकर्मीय राज्यस्तरीय आदर्श बुद्धिमान ओबीसी सुतार समाजात दिग्गज, मातब्बर,कर्तबगार,कर्तृत्ववान,कार्यसम्राट,धडाकेबाज इत्यादी अनमोल बहुमोल सन्मानजनक समाज नेतेगिरीचा मनमुरादपणे,मनसोक्तपणे आनंद उपभोगला असेल आणि सद्यस्थितीत नेतेगिरीचा टेंभा मिरवत असतील अशा सर्वच कर्तबगार, कर्तृत्ववान,कार्यसम्राट,दिग्गज धुरंधर,मातब्बर,धडाकेबाज युवक नेत्यांनी जोरदार फिल्डींग लावावी,जोरदार ताकदीने उपोषणासाठी बसणार आहोत या संदर्भात सर्वच प्रकारच्या सोशल मीडियावर जोरदार प्रसिद्धी करावी यासाठी स्पेशल प्रसिद्धी पत्रक काढावे विशेषतः यासाठी आवर्जून सर्वच समाज नेत्यांनी आपापली सामाजिक यंत्रणा कामाला लावावी आणि जोरदार प्रचार करावा.

त्यासाठी संपूर्ण राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात सगळीकडे कानाकोपऱ्यात वाडीवस्ती,गावागावात,खेडोपाडी,शहरात या संदर्भात संपूर्ण विश्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजाला माहिती व्हावी यासाठी समाजात आपण केलेल्या आणि समाजात निरपेक्ष शुद्ध हेतूने करीत असलेल्या समाजहितासाठी समाजोपयोगी विविध उपक्रमांची माहिती प्रसिद्धी करण्यासाठी असलेली आपापली तरबेज यंत्रणा राबवावी आणि आपापल्या संघटनांच्या लेटरपॅडवर संबंधित जबाबदार पदाधिकारी यांची स्वाक्षरी करून खाली नाव लिहून आणि शिक्का मारून प्रसिद्ध करावे गरज भासल्यास यासाठी स्पेशल भव्यदिव्य पत्रकार परिषद आयोजित करावी.

या ओबीसी आरक्षण बचाव उपोषणासाठी संबंधित सर्वच विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज नेत्यांनी लवकरच उपोषणाची तारीख आणि राज्यातील मध्यवर्ती ठिकाण जाहीर करावे आणि ओबीसी संदर्भात ओबीसी सुतार समाजातील जबाबदार नेतृत्व म्हणून नैतिक जबाबदारी म्हणून समाज नेतृत्व म्हणून ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठी हातभार लावावा आणि खऱ्या अर्थाने विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजातील वैचारिक दृष्टीने परिपक्व नेतृत्व सिद्ध करावे तरच आपण विश्वकर्मीय राज्यस्तरीय आदर्श ओबीसी सुतार समाजात नेतेगिरी करण्यास लायक आणि अभिनंदनास सुद्धा लायक ठराल!

जय विश्वकर्मा जय संविधान जय ओबीसी.

***********

प्रमोद सूर्यवंशी चिखली मातृतीर्थ बुलडाणा :-
८६०५५६९५२१.

# चांदा जिल्हा विभाजन: गडचिरोली जिल्हा नुतन!

माझ्या गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी बांधवांची विशिष्ट व पावन अशी संस्कृती आहे. त्यांचे पेरसा पेन हे दैवत आहे. ते शुभ कार्याप्रसंगी किवा पिकांचे उत्पादन झाल्यावर रेला नृत्य करून आनंद व्यक्त करतात. ढोल हे सुद्धा त्यांचे आवडीचे वाद्य आहे. होळी, पोळा, दसरा व दिवाळी हे त्यांचे मुख्य सण आहेत. आदिवासी जमात ही मुख्यतः जिल्ह्याच्या घनदाट जंगलात वास्तव्य करून आहे. जिल्ह्यातील इतर जातीतील लोक त्यांचे पोळा, गणपती, दसरा, दिवाळी, होळी, ईद, नाताळ, बुद्धपौर्णिमा इत्यादी सण गुण्यागोविंदाने साजरे करतात. जिल्ह्याच्या काही भागात झाडीपट्टीतील प्रसिद्ध दंडार, नाटक, तमाशा, सोंग, कव्वाली, इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यांचे दिवाळी ते होळी या कालावधीत विविध भागात आयोजन केले जाते. यामुळे झाडीपट्टी नाटकासाठी वडसा हे तालुक्याचे ठिकाण प्रसिद्ध आहे. गणपती, दसरा, होळी आदी सणांचे वेळी तसेच शंकरपट, मंडई, जत्रा, गळ यांच्या निमित्ताने आयोजन होते. अधिक माहितीसाठी वाचा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा हा संपूर्ण लेख.... संपादक.

गडचिरोली जिल्हा हा दि.२६ ऑगस्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्यापासून वेगळा करण्यात आला. तेव्हा हा महाराष्ट्राचा ३१वा जिल्हा म्हणून अस्तित्वात आला. गडचिरोली व सिरोंचा हे चंद्रपूर जिल्ह्यामधील तालुके होते. गडचिरोली जिल्हा महाराष्ट्र राज्यात ईशान्य दिशेला असून तेलंगणा व छत्तीसगड राज्यांच्या सीमेलगत आहे. हा जिल्हा नक्षलग्रस्त म्हणून सर्वश्रुत आहे. जिल्हा जवळपास ७६ टक्के घनदाट जंगलाने व्यापलेला असल्याने त्यांत नक्षलसमर्थक आश्रय घेतात. जिल्ह्याचे क्षेत्रफळ १४,४१२ चौकिमी आहे. हा जिल्हा नागपूर विदर्भ प्रदेशात मोडतो. जिल्ह्याचे मुख्यालय गडचिरोली येथे आहे. त्यातील तालुके अहेरी, आरमोरी, एटापल्ली, कुरखेडा, कोरची, गडचिरोली, चामोर्शी, देसाईगंज-वडसा, धानोरा, भामरागड , मुलचेरा, सिरोंचा असे एकूण १२ आहेत. महाराष्ट्रात गडचिरोली जिल्ह्याचे स्थान हे राज्याची राजधानी मुंबईच्या विरुद्ध दिशेला शेवटच्या टोकावर आहे.

जिल्ह्यात अनुसूचित जातीच्या लोकांची संख्या १,०८,८२४ एवढी असून तिची एकूण टक्केवारी ११.२ होते. आदिवासी जमातींच्या लोकांची संख्या ३,७१,६९६ एवढी असून त्यांचे प्रमाण जिल्ह्यात जास्त आहे. त्यांची टक्केवारी ३८.३० एवढी आहे. येथे बहुजन समाजही येथील आदिम संस्कृतीशी एकरुप झालेला आढळतो. जिल्ह्यात एकूण लोकसंख्येपैकी ३८ टक्के लोकसंख्या ही अनुसूचित जमातीची असल्याने हा जिल्हा महाराष्ट्रातला आदिवासीबहुल जिल्हा समजला जातो. अनुसूचित जमातीमध्ये मुख्यत्वे गोंड, हलबा, कोलाम, माडिया, बडा माडिया, परधान इत्यादी जमातीचे लोक आहेत. त्यांच्या बोलीभाषा गोंडी, माडिया, हलबी आदी आहेत. गडचिरोली जिल्ह्यामध्ये यांशिवाय मराठी, हिंदी, तेलुगू, बंगाली व छत्तीसगडी इत्यादी भाषा बोलल्या जातात. फार प्राचीन काळी या प्रदेशावर राष्ट्रकूटांचे राज्य होते. त्यानंतर चालुक्य वंशाचे व नंतर देवगिरीच्या यादवांचे राज्य आले. यानंतर गडचिरोलीवर गोंड राजांनी राज्य केले. तेराव्या शतकात, खंडक्या बल्लाळशाह यांनी चंद्रपूरची स्थापना केली. त्यांनी आपली राजधानी सिरपूर येथून चंद्रपूर येथे हलविली. याच काळात चंद्रपूर प्रदेश हा मराठ्याच्या सत्तेखाली आला. सन १८५३मध्ये बेरार हा चंद्रपूर-पूर्वीचा चांदा प्रदेशाचा भाग ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात आला. सन १८५४मध्ये चंद्रपूर हा बेरार या प्रदेशामधला स्वतंत्र जिल्हा म्हणून अस्तित्वात आला. ब्रिटिशांनी सन १९०५मध्ये चंद्रपूर व ब्रह्मपुरी यांतील जमीनदारी व मालमत्ता हस्तांतरण करून गडचिरोली तालुक्याची निर्मिती केली होती. राज्याची पुनर्रचना होण्यापूर्वी हा भाग सन १९५६पर्यंत केंद्रीय अधिपत्याखाली होता. त्यानंतर राज्य पुनर्रचनेनुसार चंद्रपूर बॉम्बे स्टेटमध्ये समाविष्ट करण्यात आले. सन १९६०मध्ये महाराष्ट्र राज्य निर्माण झाले, त्यांत चंद्रपूर हा जिल्हा समाविष्ट झाला. दि.२६ ऑगस्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून स्वतंत्र गडचिरोली जिल्हा हा भारताचा ५५६वा जिल्हा म्हणून अस्तित्वात आला. वैनगंगा नदीला सीमारेषा मानून चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करण्यात आले.

जिल्ह्यात दोन नगरपालिका असून त्या गडचिरोली व वडसा येथे आहेत. येथील महाविद्यालये ही गोंडवाना विद्यापीठाच्या अंतर्गत येतात. शासकीय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली व गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक कॉलेज, गडचिरोली हे येथील वैभव समजले जाते. या जिल्ह्यात गोंडवाना सैनिकी विद्यालय नावाचे एक लष्करी शिक्षण विद्यालय आहे. प्रेक्षणीय स्थळे मार्कंडा, चपराळा, आलापल्ली, वैरागड. हेमलकसा व कामलापूर ही आहेत. येथील चामोर्शी तालुक्यातील मार्कंडादेव हे मार्कंडेश्वराचे ऐतिहासिक शिवमंदिर व चप्राळा येथील हनुमान मंदिर प्रसिद्ध आहेत. तर कुरखेडा तालुक्यातील मालेवाडा येथून १० किमी अंतरावर खोब्रामेंढा देवस्थान असून तेथे खुप मोठी मारुतीची मूर्ती आहे. या तिन्ही ठिकाणी महाशिवरात्रीला खुप मोठी यात्रा भरते. मार्कंडा देवस्थानास विदर्भाची काशी म्हणून ओळखले जाते. सुप्रसिद्ध डॉ.अभय बंग व त्यांची पत्नी राणी बंग यांचे सर्च- शोधग्राम, गडचिरोली ही संस्था तेथील आदिवासी बांधवांना आरोग्यसेवा पुरवते. तर डॉ.प्रकाश आमटे यांची लोक-बिरादरी हेमलकसा व भामरागड ही संस्थादेखील आदिवासी बांधवांना सामाजिक व आरोग्यविषयक मदत करते. हा जिल्हा बांबूची झाडे व तेंदूपानांकरिता प्रसिद्ध आहे. धान- भात हे जिल्ह्याचे मुख्य पीक आहे. याव्यतिरिक्त तूर, गहू, ज्वारी, सोयाबीन, जवस, उडिद, मूग, भुईमूग, भाजीपाला, इत्यादी कृषी उत्पादने घेतली जातात. जिल्ह्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा मोसमी पावसावर अवलंबून आहे. जिल्ह्यात चामोर्शी तालुक्यामध्ये आष्टी येथे पेपर मिलचा कारखाना असून इतर कोणतेही मोठे उद्योगधंदे नाहीत. सुशिक्षित तरुणवर्गास गाईगुरे व शेळ्या राखण्याशिवाय पर्याय नाही. बेरोजगारीने त्याच्या मनात न्यूनगंड निर्माण होत आहे. यामुळे जिल्हा हा आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. जिल्ह्यात भाताचे उत्पादन जास्त होत असल्याने भात गिरण्यांची संख्या जास्त आहे. भातसडीचे उद्योग व कागद कारखाने जिल्ह्यात आहेत, मात्र मोठे उद्योग नाहीत, विकास नाही. जिल्ह्यात कोसाचे उत्पादन होत असून कोसा उत्पादन केंद्र आरमोरी येथे आहे. जिल्ह्याच्या नशिबी फक्त १८.५ किमी लांबीचा रेल्वे मार्ग असून देसाईगंज येथेच ब्रिटिश कालीन रेल्वेचे छोटेखानी स्टेशन आहे. जिल्हाला एकच मोठी बाजारपेठ आहे, ती वडसा- देसाईगंज येथे भरते. वडसा हे शहर वैनगंगा नदीच्या काठावर वसलेले असून जिल्ह्यातील एकमेव रेल्वे लाईन गोंदिया-नागभीड-चंद्रपूर येथून जाते. त्यामुळे येथे मोठी बाजारपेठ आहे. गडचिरोली जिल्हा मुख्यालय फक्त नाममात्र आहे. येथील लोकप्रतिनिधी स्वार्थ अधिक साधतात; तर माझ्या जिल्ह्याच्या विकासाकडे दुर्लक्षच करतात, हे येथे विशेष उल्लेखनीय! !! ४१व्या गडचिरोली जिल्हा वर्धापन दिन सप्ताह निमित्त सर्व जिल्हावासीयांना हार्दिक शुभेच्छा !!

***********

निकोडे कृष्णकुमार आनंदी-गोविंदा.
(वैभवशाली भारताच्या इतिहासाचे गाढे अभ्यासक)
गडचिरोली, फक्त व्हॉटसॅप-
९४२३७१४८८३.

# बाबासाहेबांनी केलेल्या धम्मक्रांतीला जगात तोड नाही पण काही जात्यांध लोक प्रतिक्रांती करू पहात आहेत त्यांचे मनसुबे हनुन पाडा..!

## डॉक्टर भीमराव यशवंत आंबेडकर

दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभे चा २७ वा वर्धापनदिन – बुद्ध प्रतिष्ठान वाशी नवी मुंबई येथे उत्साहात साजरा करण्यात अला. त्यावेळी डॉ. भिमराव यशवंत आंबेडकर यांनी वरील उदगार काढले. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. भिमराव यशवंत आंबेडकर ते पुढे आसे ही म्हणाले की, बोधिसत्व प.पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे केलेल्या धम्मक्रांतीला जगात तोड नाही पण काही जात्यांध – मनुवादी लोक प्रतिक्रांती करू पहात आहेत त्यांचे मनसुबे हनुन पाडायचे आसेल तर...अता आपण सर्व वंचित बहुजनांनी सावधान राहीले पाहीजे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात राजकीय सत्ता हिच तुमच्या सर्व समस्यांची गुरू किल्ली आहे ति प्राप्त करा..!, डॉ. बाबासाहेब आसे ही म्हणतात की, ज्या धम्माला राजाश्रय आसतो तोच धम्म वाढतो..!! आणि म्हणून धम्मकरणाबरोबर अता राजकारण करायला काहीच हरकत नाही..! आसे स्पष्ट आणि परखड शब्दात आपले विचार मांडले. त्यावेळी उपस्थित जनसमुदायातुन टाळ्यांचा कडकडाट झाला.






नवी मुंबई / के. एच. हनवते :– भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हयाच्या वतीने व नवी मुंबई जिल्हा महिला कमिटीच्या विद्यमाने बुद्ध प्रतिष्ठान सेक्टर – १५ , वाशी (नवी मुंबई ) येथील शानदार हॉल मधे २७ वा भव्यदिव्य वर्धापनदिन सोहळा खुपच शानदार, देखणा व अप्रतिम व आदर्श घेण्यासारखा होता. यावेळी उपस्थित मान्यवर व केंद्रीय पदाधिकारी, महाराष्ट्र पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. बुद्ध प्रतिष्ठानचे अध्यक्ष : डॉ आनंत हर्षवर्धन यांनी शुभेच्छांपर बोलतांना म्हटले की येथून पुढील धम्म कार्यास हा हॉल भारतीय बौद्ध महासभेला वेळो वेळी उपलब्ध करून दिला जाईल व त्यांना योग्य ते हमेशा सहकार्य करील आसे अश्वासन दिले त्यावेळी बुद्ध प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष नेताजी कांबळे हे पण उपस्थितहोते. आम्ही भाग्यशाली आहोत की डॉ. बाबासाहेबांचे नातू या भवनातुन अपना सर्वांना संबोधित करित आहेत. तद्नंतर भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष डॉ. भिमराव यशवंत आंबेडकर साहेब या सर्वांच्या मार्गदर्शनाने नवी मुंबई भारतीय बौद्ध महासभा शाखांना व महिला शाखांना धम्मकार्य अधिक जोमाने करण्याचे खुपच चांगले मोलाचे मार्गदर्शन मिळाले. आयोजक जयवंत लव्हांडे गुरुजी ( जिल्हाध्यक्ष ) आणि त्यांची संपुर्ण टिम आणि आयु. शोभाताई कांबळे ( महिला – जिल्हाध्यक्ष ) आणि त्यांची संपुर्ण टिम सर्वानी सुरेख असे नियोजन करुन, असा शानदार कार्यक्रम ठेवुन सदर कार्यक्रमामुळे चांगले धम्मामृत आंम्हाला मिळाले. चांगले आणि उत्कृष्ट धम्म कार्य करणाऱ्या शाखांना सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात श्रामनेरी ( केंद्रिय शिक्षिका ) व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव गौरव केल्याबद्दल आंम्ही सर्व नवी मुंबई जिल्हयाचे आभारी आहोत. नवी मुंबई जिल्ह्याला महाराष्ट्रामध्ये प्रथम क्रमांकाचा जिल्हा प्राप्त करण्यासाठी आपण सर्व जिल्हा पदाधिकारी व सर्व शाखांनी कठोर मेहनत घेवुन वाटचाल सुरु केलेली आहे. सर्व मान्यवरांच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात जिल्हयाच्या कार्यशैलीमुळे राबविलेली अनेक शिबिरे, इतर उपक्रम, पर्यटन, अहवाल जिल्हयाच्या कार्यकर्तुत्वाची पावती म्हणुन वरिष्ठांनी दिलेली शाबासकी ! हेच खरे जिल्हयाचे श्रेय आहे. या शाबासकीमुळे जोमाने काम करण्याची उर्जा आपल्या सर्वाना प्राप्त झाली. तथागत महाविहार सेक्टर – १२ , खारघर, नवी मुंबई येथील शाखेस आदर्श शाखा पुरस्कार मिळाल्याबद्दल आर. बी. भारती गुरुजी ( अध्यक्ष ) व इतर कार्यकारिणी यांचे विशेष अभिनंदन ! त्याचप्रमाणे विशेष सहकार्य शाखा पुरस्कार सतिष खंडाळे (अध्यक्ष – पंचशील बुद्ध विहार या शाखेला ) मिळाल्याबद्दल पंचशील बुध्द विहार कार्यकारिणीचे अभिनंदन ! आपले उर्जास्थान जयवंत लव्हांडे गुरुजी ( जिल्हाध्यक्ष ), जिवन वाडते गुरुजी ( सरचिटणीस ), प्रकाश माने गुरुजी (कोषाध्यक्ष ), आणि संपुर्ण टिम, आयु. शोभाताई कांबळे ( महिला –जिल्हाध्यक्ष ), ज्योतीताई जाधव ( महिला जिल्हा सरचिटणीस ), सुनिताताई सुरवसे महिला जिल्हा कोषाध्यक्ष ) यांनी संपुर्ण टिमचे अभिनंदन करून पुढीलधम्मकार्यास मंगलमय हार्दिक शुभेच्छा दिल्या व शेवटी सरणत्तय घेऊन कार्यक्रम संपन्न केला.

# श्रवणदोषाच्या लवकर निदानासाठी प्रत्येक बालकाची आरोग्य तपासणी करून घ्यावी – जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे





लातूर :– जिल्ह्यातील शून्य ते सहा वर्षे वयोगटातील श्रवणदोष असलेल्या बालकांचा शोध घेवून, त्यांच्यावर वेळीच आवश्यक उपचार करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने 'मिशन साद' हा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. या अंतर्गत प्रत्येक बालकाची आरोग्य तपासणी करून घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी आज येथे केले. जिल्हा प्रशासन, उमंग इन्स्टिट्यूट आणि राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने 'मिशन साद' अंतर्गत आज प्रबोधनकार ठाकरे चौक येथील अंगणवाडीमध्ये तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन झाले. लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी जावेद शेख, नायब तहसीलदार गणेश सरोदे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. लहान मुलांमधील श्रवणदोषाचे लवकर निदान होवून वेळीच उपचार झाल्यास या मुलांमधील श्रवणदोष दूर होवू शकतो. त्यामुळे शून्य ते सहा वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाची तपासणी करून घेण्यासाठी जिल्ह्यात अंगणवाडी स्तरावर 'मिशन साद' अंतर्गत आरोग्य तपसणी शिबिरे आयोजित केली जात आहेत. अंगणवाडी सेविका, आशा सेविका यांनी आपल्या क्षेत्रातील प्रत्येक बालकाची तपासणी करून घेण्यासाठी पालकांना मार्गदर्शन करावे, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यावेळी म्हणाल्या. तसेच पालकांनी आपल्या मुलांमध्ये श्रवणदोष दिसून येत असल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता वेळीच योग्य तपासणी आणि उपचार करून घ्यावेत. लवकर उपचाराने हा दोष दूर होतो, असे त्यांनी सांगितले. आरोग्य तपासणीसाठी बालकांना घेवून आलेल्या पालकांशी जिल्हाधिकारी यांनी यावेळी संवाद साधला. तसेच आरोग्य तपासणी कार्यपद्धतीची माहिती जाणून घेतली. शिबिराच्या आयोजनासाठी परिश्रम घेतलेल्या अंगणवाडी सेविका, आशा सेविका यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते यावेळी सत्कार करण्यात आला. उमंग इन्स्टिट्युटच्या आरोग्य तपासणी मोबाईल युनिटची त्यांनी पाहणी केली. लातूर शहर महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शंकर भारती, बालविकास प्रकल्प अधिकारी प्रिया तारु, उमंग इन्स्टिट्यूटचे प्रकल्प संयोजक किरण उटगे , व्यवस्थापक, श्रीहरी गोरे, रामेश्वर जाधव, स्पीच न्ड ऑडिओलॉजीस्ट तज्ज्ञ डॉ. श्रीशैलम तलारी, डॉ. विरेश मायनाळे, डॉ. वैभव उटगे, डॉ. प्रगती रामटेके, मानसशास्त्रज्ञ गणेश डोंगरे, ऑक्युपेशनल थेरपीस्टडॉ. अर्जुन राठोड, डॉ. अदिती सोळंके, फिजिओथेरपीस्ट डॉ. शिवानी पाटील यावेळी उपस्थित होते.

## ठिसूळ हाडे मजबूत होण्यासाठी नियमित खा चण्याचा लाडू, वाचा सोपी रेसिपी



वाढत्या वयानुसार शरीरातील हाडांचे दुखणे वाढू लागते. वय वाढल्यानंतर महिला आणि पुरुषांच्या शरीरात अनेक बदल होतात. पण सार्वधिक बदल हे महिलांच्या शरीरामध्ये होतात. त्यामुळे विशेष करून महिलांनी आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. रोजच्या आहारात शरीराला आवश्यक असलेल्या पदार्थांचे सेवन करावे. शरीरामध्ये रक्ताची कमतरता निर्माण झाल्यानंतर आरोग्यावर त्याचे वाईट परिणाम होतात. त्यामुळे बिघडलेले हाडांचे आरोग्य सुधारण्यासाठी आहारात भाजलेले चणे आणि शेंगदाण्याचा समावेश करावा. भाजलेले चणे खाल्ल्यामुळे शरीरात रक्ताचे प्रमाण वाढते. तसेच चण्यामध्ये प्रोटीन्स कार्बोहायड्रेट्स, फायबर्स, विटामिन्स, मिनरल्स मोठ्या प्रमाणावर आढळून येतात. पॉलिफेनॉल्स, फायटोन्युट्रिएंट्स, बिटाकॅरोटीन यांसारखे गुणधर्म सुद्धा चण्यांमध्ये असतात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला चण्यांपासून पौष्टिक लाडू कसे बनवायचे याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. तुम्ही बनवलेले लाडू घरातील सगळेच आवडीने खातील. साहित्य: चण्याचे पीठ तूप साखर किंवा गूळ वेलची पावडर काजू बदाम पिस्ता कृती: चण्याचे पौष्टिक लाडू बनवण्यासाठी सर्वप्रथम कढईमध्ये तूप गरम करण्यासाठी ठेवा. तूप गरम झाल्यानंतर त्यात बारीक केलेले काजू, बदाम आणि पिस्ता टाकून भाजून घ्या. त्यानंतर त्याच कढईमध्ये चण्याचे पीठ भाजून घ्या. पीठ भाजताना गॅस बारीक ठेवा. भाजलेले पीठ व्यवस्थित थंड झाल्यावर त्यात साखर आणि वेलची पावडर , भाजलेले काजू, बदाम टाकून मिक्स करून घ्या. तयार मिश्रणाचे छोटे छोटे लाडू हाताने बांधून घ्या. हे लाडू जास्त दिवस टिकण्यासाठी हवा बंद डब्यात ठेवा. तयार आहेत चण्याचे पौष्टिक लाडू.

## पावसाळ्यातील आर्द्रतेमुळे चेहरा सतत चिकट होतो? मग वापरून पहा 'हे' फेसमास्क

क्षणभर विश्रांती घेतलेल्या पावसाने पुन्हा एकदा राज्यभरात सगळीकडे हजेरी लावली आहे.वातावरणात सतत होणाऱ्या बदलांचा परिणाम आरोग्यासह त्वचा आणि केसांवर लगेच दिसून येतो. रोगराई वाढल्यामुळे आरोग्य बिघडून जाते. तसेच पावसाळ्याच्या दिवसांमध्ये हवेमध्ये गारवा आणि आर्द्रता असते. या आद्रतेचा सगळ्यात जास्त परिणाम चेहऱ्यावर दिसून येतो. कुठेही बाहेर जाऊन आल्यानंतर किंवा घरी असल्यावर चेहरा पूर्णपणे तेलकट होऊन जातो. त्वचेवर चिकटपणा आणि तेलकटपणा वाढतो. चेहऱ्यावर तेल दिसू लागल्यानंतर तात्काळ चेहरा स्वच्छ केला नाही तर मुरूम किंवा किंवा पुरळ येतात. चेहऱ्यावर साचलेल्या तेलामुळे त्वचेवर पिंपल्स येतात. चेहऱ्यावर आलेले पिंपल्स काही दिवसांनंतर निघून जातात, मात्र त्यांचे डाग तसेच राहतात. तेलकट चेहऱ्यावर मेकअप करणे पावसाळ्यात कठीण होऊन जाते. मेकअप केल्यानंतर घाम आला की सगळं मेकअप निघून जातो. त्यामुळे मेकअप करण्याआधी चेहऱ्यावर फेसमास्क लावा.

# दिवसभरात किती वेळा चहा पिणे योग्य? जाणून घ्या तज्ज्ञांचा सल्ला

चहा प्यायला कोणाला आवडत नाही. दिवसाची सुरुवातच चहाने होते. इथे चहाप्रेमींची कमतरता नाही. अनेकांना कधीही चहा द्या आणि ते मोठ्या उत्साहाने पितात. बहुतेक लोकांच्या दिवसाची सुरुवात बेड टीने होते. तुम्ही मर्यादित प्रमाणात चहा प्यायला तर ठीक आहे, पण तुम्ही दिवसातून अनेक वेळा चहा प्यायल्यास, त्यामुळे तुम्हाला दीर्घकाळात मोठ्या शारीरिक समस्या निर्माण होऊ शकतात. जास्त चहा प्यायल्याने झोपेची समस्या तर होतेच पण पचनाच्या समस्याही होतात. चहाचे जास्त प्रमाणात सेवन केल्याने देखील हाडे कमजोर होतात. जाणून घ्या चहा पिण्याचे तोटे.

बहुतेक लोक सकाळची सुरुवात चहा पिऊन करतात. सकाळचा एक कप चहा तुमच्या अनेक समस्यांना जन्म देऊ शकतो, परंतु आपल्यापैकी बरेचजण दिवसभरात १ किंवा २ नव्हे तर अनेक कप चहाचे सेवन करतात. तुम्ही चहा मनसोक्त पितात. पण तुम्हाला माहित आहे का की दिवसातून अनेक कप चहाचे सेवन केल्याने तुम्हाला अनेक गंभीर समस्या उद्भवू शकतात. डाएट मंत्रा क्लिनिकच्या आहारतज्ञ कामिनी कुमारी सांगतात की, जर तुम्ही दिवसातून ३ ते ४ कप चहाचे सेवन केले तर त्याचा तुमच्या आरोग्यावर घातक परिणाम होऊ शकतो. चहा प्यायल्याने ६ समस्या वाढू शकतात झोप जे लोक जास्त चहा पितात त्यांना सामान्य लोकांपेक्षा झोपेशी संबंधित समस्या जास्त असू शकतात. चहामध्ये कॅफीन असते जे उत्तेजक असते. कॅफीनचे जास्त प्रमाणात सेवन केल्याने निद्रानाश, अस्वस्थता आणि चिंता यासारख्या समस्या उद्भवू शकतात. पचन जर तुम्हाला पचनाच्या समस्येचा सामना करावा लागत असेल, तर चहा पिणे मर्यादित करा. चहामध्ये असलेले टॅनिन पोटात सिडचे प्रमाण वाढवू शकतात. यामुळे सिडिटी, अपचन आणि बद्धकोष्ठता यांसारख्या समस्या उद्भवू शकतात.

# महिला सक्षम झाल्या तरच भारत महासत्ता बनेल – आ.निलंगेकर

## केंद्र आणि राज्य शासनाचे महिलांना सक्षम करण्यासाठी ऐतिहासिक निर्णय

मतदारसंघातील जनतेच्या कायम सोबत – आ.निलंगेकर
काँग्रेसने अपप्रचार करून लोकसभेच्या निवडणूका लढवल्या. आरक्षणाचा विषय घेऊन अपप्रचार केला.आताही हाच उद्योग सुरू आहे.पण मी कायम जनतेसोबत आहे.मराठा समाजाच्या आरक्षणाला रस्त्यावर येऊन पाठींबा दिला.कोरोना काळात मदत केली.नैसर्गिक संकटात मी स्वत: मतदार संघातील नागरिकांच्या सोबत राहिलो. विकास हे चक्र आहे.ते सुरुच राहणार आहे. जनसन्मान यात्रेचा प्रतिसाद पाहून विरोधकांचे धाबे दणाणले असल्याचे आ.निलंगेकर म्हणाले.

ना.बनसोडे,आ.पंकजा मुंडेंचा सहभाग
आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी सुरू केलेल्या जनसन्मान पदयात्रेत ना.संजय बनसोडे यांनी सोमवारी सहभाग घेतला. सोमवारी रात्री धनेगाव येथे झालेल्या जाहीर कार्यक्रमास ते उपस्थित राहिले.तत्पूर्वी धनेगांव– हेळंब रस्त्यावर १४ कोटी ५८ लाख रुपये खर्चून उभारलेल्या पुलाचे लोकार्पण ना.बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले.मंगळवारी आ. पंकजाताई मुंडे यादेखील यात्रेत सहभागी होणार आहेत.वलांडी येथे होणाऱ्या सभेत त्या मार्गदर्शन करणार आहेत.





निलंगा/प्रतिनिधी : केंद्र आणि राज्य शासन महिलांना सक्षम करण्यासाठी ऐतिहासिक निर्णय घेत असून बचत गटाच्या माध्यमातून उद्योग व्यवसायाला चालना मिळावी म्हणून आर्थिक मदत देत आहे.भविष्यात महिलांना केंद्रस्थानी ठेवून आर्थिक तरतुदीचे बँकाना आदेश दिले आहेत.महिला सक्षम झाल्या तर देश महासत्ता बनेल,असे प्रतिपादन आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यानी केले. जन सन्मान पदयात्रे दरम्यान अंबुलगा बु.येथील जाहीर सभेत आ. निलंगेकर बोलत होते. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष सुभाष म्हेत्रे, संजय दोरवे,दगडू सोळुंके, चेअरमन अरविंद चव्हाण, जेष्ठ स्वातंत्र्यसेनानी विठ्ठलराव होरे,शेखर मिरगाळे,माधव पाटील, दिलीप मिरगाळे, विजयकुमार शिंदे,लालू शेख,दशरथ गोडगे, शिवाजी होरे,नरसिंग म्हेत्रे,शिवाजी सुर्यवंशी, विलास पाटील,नामदेव हल्लाळे,शिवकरण होरे आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना आ. निलंगेकर म्हणाले,निलंगा मतदारसंघात आतापर्यंत १ लाख महिलांचे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे अर्ज आले आहेत.त्यात प्रत्यक्ष ६५ हजार महिलांना लाभ मिळाला आहे.यापुढील टप्प्यात उर्वरीत महिलांना शंभर टक्के लाभ मिळणार आहे.देशातील शंभर टक्के महिलांना आर्थिक सक्षम केल्यावरच देश महासत्ता होणार आहे. हाच हेतू डोळ्यासमोर ठेवून केंद्र व राज्य सरकार काम करत आहे,असे त्यांनी सांगितले. सोमवारी सकाळी हलगरा येथून निघालेल्या या जनसन्मान यात्रेच्या तिसऱ्या दिवशी अंबुलगा बु येथे जाहीर सभा झाली. गावात प्रवेश होताच भजन,ढोल–ताशा व फटाक्यांच्या आतिषबाजीत आ. निलंगेकर यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी शिवनंदा मिरगाळे,संगीता आंबेगावे, सुनिता मिरगाळे,बबिता कांबळे,शिवनंदा कांबळे, दैवशाला होरे,धोंडाबाई बिरादार,विदेशा गायकवाड,संगीता बिराजदार,अनिता थोटे,प्रेमा गुंडूरे आदी महिलांनी आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांचे राखी बांधून औक्षण केले. प्रास्तविक प्रेमिला शिंदे, सुत्रसंचलन चंद्रशेखर मिरगाळे यांनी तर आभार संदीप पाटील यानी मानले. सोमवारी ही पदयात्रा हनुमंतवाडी (हा.),लहुवाडी मोड,बोटकुळ मोड, हाणमंतवाडी (अ.बु.), अंबुलगा बु., आनंदवाडी,शिऊर,धनेगाव, हेळंब या गावांत पोहोचली.तेथील नागरिकांशी संवाद व चर्चा झाली.रात्री हेळंब येथील जि.प.शाळेत यात्रेत सहभागी झालेल्यांनी मुक्काम केला.

# सोयाबीनला कवडीमोल भाव; शेतकरी हैराण

किनवट/शेख शौकत किनवट/शेख शौकत खरीप पिकासाठी हस्तक्षेप करावा अशी मागणी किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष कॉ. अर्जुन आडे यांनी केली आहे. हंगामातील सोयाबीन बाजारात येण्यापूर्वीच सोयाबीनचे दर घसरले आहेत. सोयाबीनचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढलेला असताना दुसऱ्या बाजूला सरकारने जाहीर केलेल्या दरापेक्षा ७९२ ते १३९२ रुपये प्रति क्विंटल कमी दराने शेतकऱ्यांना सोयाबीन विकावे लागत असल्याने या परिस्थितीमध्ये सरकारने तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना होत असलेला तोटा थांबवावा व आगामी काळात सोयाबीनला जास्त भाव मिळतील आहे. हंगामातील मुख्य सोयाबीन पिकाची केंद्र सरकारने सुरू असलेल्या हंगामासाठी सोयाबीनला ४८९२ प्रतिक्विंटल हमीभाव जाहीर केला असताना सध्या शेतकऱ्यांना बाजारामध्ये ३५०० ते ४१०० रुपये प्रतिक्विंटल दराने सोयाबीन विकावे लागत आहे. खरीप हंगामात सुरुवातीला आगाप सोयाबीन बाजारामध्ये विक्रीसाठी येऊ लागले अद्याप आवक सुरू झालेली नाही. असे असताना आत्ताच दर कोसळलेले आहेत. ही परिस्थिती पाहता प्रत्यक्ष खरीप हंगामातील सोयाबीन मोठ्या प्रमाणात जेव्हा बाजारात येईल तेव्हा हे भाव आणखीन खाली जाणार आहेत. सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणामुळे सोयाबीनचे दर गेले दोन वर्ष सातत्याने घसरत आहेत. आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा परिणाम म्हणून सोयाबीनचे दर ११००० रुपये प्रति क्विंटल पर्यंत पोहोचले होते. मात्र सरकारने तेव्हा तातडीने हस्तक्षेप करत सोयापेंड आयातीचा निर्णय घेतला. त्याचा परिणाम म्हणून सोयाबीनचे दर कोसळायला सुरुवात झाली. सरकारने सोयातेल आयातीला खुले प्रोत्साहन दिले आहे. त्याचा परिणाम म्हणून सोयाबीनचे दर सातत्याने कोसळत आहेत. केंद्र सरकारने मोठा गाजावाजा करून सोयाबीनचे हमीदर जाहीर केले असताना हंगामाच्या अगोदरच शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा ७९२ ते १३९२ रुपये प्रति किंटल तोटा घेऊन सोयाबीन विकावे लागत असेल तर ही अत्यंत अन्यायकारक व खेदजनक बाब आहे. केंद्र सरकारने याबाबत तातडीने हस्तक्षेप करावा व किमान आधार भावाच्या वर सोयाबीनला भाव मिळेल यासाठी उपाययोजना कराव्यात अन्यथा सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचा आक्रोश सरकारला बुडवेल असा इशारा किसान सभेने प्रसिध्दी माध्यमांनद्वारे दिला आहे.साठी हस्तक्षेप करावा अशी मागणी किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष कॉ. अर्जुन आडे यांनी केली आहे. हंगामातील सोयाबीन बाजारात येण्यापूर्वीच सोयाबीनचे दर घसरले आहेत. सोयाबीनचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढलेला असताना दुसऱ्या बाजूला सरकारने जाहीर केलेल्या दरापेक्षा ७९२ ते १३९२ रुपये प्रति क्विंटल कमी दराने शेतकऱ्यांना सोयाबीन विकावे लागत असल्याने या परिस्थितीमध्ये सरकारने तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना होत असलेला तोटा थांबवावा व हागामी काळात सोयाबीनला जास्त भाव मिळतील शेतकऱ्यांना याची अपेक्षा आहे. खरिपातील मुख्य सोयाबीन पिकाची केंद्र सरकारने सुरू असलेल्या हंगामासाठी सोयाबीनला ४८९२ प्रतिक्विंटल हमीभाव जाहीर केला असताना सध्या शेतकऱ्यांना बाजारामध्ये ३५०० ते ४१०० रुपये प्रतिक्विंटल दराने सोयाबीन विकावे लागत आहे. खरीप हंगामात सुरुवातीला आगाप सोयाबीन बाजारामध्ये विक्रीसाठी येऊ लागले अद्याप आवक सुरू झालेली नाही. असे असताना आत्ताच दर कोसळलेले आहेत. ही परिस्थिती पाहता प्रत्यक्ष खरीप हंगामातील सोयाबीन मोठ्या प्रमाणात जेव्हा बाजारात येईल तेव्हा हे भाव आणखीन खाली जाणार आहेत का? सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणामुळे सोयाबीनचे दर गेले दोन वर्ष सातत्याने घसरत आहेत. आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा परिणाम म्हणून सोयाबीनचे दर ११००० रुपये प्रति क्विंटल पर्यंत पोहोचले होते. मात्र सरकारने तेव्हा तातडीने हस्तक्षेप करत सोयापेंड आयातीचा निर्णय घेतला. त्याचा परिणाम म्हणून सोयाबीनचे दर कोसळायला सुरुवात झाली. सरकारने सोयातेल आयातीला खुले प्रोत्साहन दिले आहे. त्याचा परिणाम म्हणून सोयाबीनचे दर सातत्याने कोसळत आहेत. केंद्र सरकारने मोठा गाजावाजा करून सोयाबीनचे हमीदर जाहीर केले असताना हंगामाच्या अगोदरच शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा ७९२ ते १३९२ रुपये प्रति किंटल तोटा घेऊन सोयाबीन विकावे लागत असेल तर ही अत्यंत अन्यायकारक व खेदजनक बाब आहे. केंद्र सरकारने याबाबत तातडीने हस्तक्षेप करावा व किमान आधार भावाच्या वर सोयाबीनला भाव मिळेल यासाठी उपाययोजना कराव्यात अन्यथा सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचा आक्रोश सरकारला बुडवेल असा इशारा किसान सभेने प्रसिध्दी माध्यमांनद्वारे दिला आहे.

## डॉ. रवी चवंडा मेमोरियल फाउंडेशनच्या रूपाने आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कला दालनाची निर्मिती व्हावी : खा. डॉ. शिवाजी काळगे





लातूर : लातुरात डॉ. रवी चवंडा मेमोरियल फाउंडेशनच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीडॉ. रवी चवंडा मेमोरियल फाउंडेशनच्या रूपाने आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कला दालनाची निर्मिती व्हावी असे प्रतिपादन खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी केले. लातूर शहरात डॉ. रवी चवंडा मेमोरियल फाउंडेशनच्या वतीने चवंडा आर्ट गॅलरीचे दि. २६ ते दि. ३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी श्रीकृष्ण जन्माष्टमीचे औचित्य साधून कान्हा चित्र प्रदर्शनीच्या उदघाटन सोहळ्याप्रसंगी खा. डॉ. काळगे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य अनिरुद्ध जाधव हे होते. यावेळी इस्कॉन मंदिराच्या अध्यक्षा माता मालिनी, महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वूमेन लॉयर्सच्या अध्यक्षा ॲड. जयश्रीताई पाटील, डॉ. राजकुमार दाताळ , चवंडा फाउंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती गीताताई चवंडा , कोषाध्यक्ष डॉ. संगमेश चवंडा , डॉ. केतकी चवंडा , नागेश स्वामी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. सुप्रिता पांचाळ यांच्या अच्युतम केशवम.. राम नारायण या भक्तीगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. खा. डॉ. काळगे यांच्या हस्ते कान्हा चित्र प्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आले. डॉ. चवंडा आर्ट गॅलरीच्या माध्यमातून लातूरच्या कलाविश्वातील कलाकारांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्यासपीठ उपलब्ध होण्यास मोलाची मदत मिळणार असल्याचे सांगून खा. डॉ. शिवाजी काळगे म्हणाले की, आपले लातूर विविध कलागुणांचे माहेरघर आहे, ही बाब सर्वज्ञात आहे. लातूरच्या भूमीत जन्मलेल्या कलाकारांना आता या आर्ट गॅलरीच्या माध्यमातून राष्ट्रीय – आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचविण्यास मदत मिळणार आहे. चवंडा आर्ट गॅलरीच्या हा उपक्रम अतिशय अभिनंदनीय व स्तुत्य असून या फाऊंडेशनला आपल्या कार्याची व्याप्ती वाढविण्यासाठी आपणही आपल्या परीने सर्वतोपरी योगदान देऊ, असे मत खा. डॉ. काळगे यांनी व्यक्त केले. प्राचार्य अनिरुद्ध जाधव यांनी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात या आर्ट गॅलरीतील चित्र प्रदर्शनात प्रदर्शित करण्यात आलेल्या कलाकृती पाहून आपल्याला एखाद्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आर्ट गॅलरीला भेट दिल्याचा अनुभव आल्याचे सांगितले. लातूरसारख्या शहरात एवढ्या उत्कृष्ट दर्जाच्या कलाकृती निर्माण करणारे हरहुन्नरी कलाकार असून त्यांना या माध्यमातून भविष्यात त्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी एक चांगले व्यासपीठ उपलब्ध झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

ॲड. जयश्रीताई पाटील यांनी या उपक्रमाला शुभेच्छा देताना आपल्या जिवलग मैत्रिणीने , गीता चवंडा यांनी लातूरच्या कलाकारांसाठी हा आगळा वेगळा उपक्रम हाती घेतल्याबद्दल संधान व्यक्त करून त्यांच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले. माता मालिनी यांनी यावेळी बोलताना भगवान श्रीकृष्ण यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे विचार व्यक्त करून या आर्ट गॅलरीमुळे अनेक होतकरू कलाकारांना स्वतंत्र मंच उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी डॉ. रवी चवंडा मेमोरियल फाउंडेशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे प्रास्तविक नागेश स्वामी यांनी केले. प्रास्तविकात त्यांनी डॉ. रवी चवंडा फाउंडेशनच्या माध्यमातून मागच्या १२ – १३ वर्षात करण्यात आलेल्या विविध सामाजिक कार्याची माहिती दिली. हे फाउंडेशन सामाजिक कार्यात अग्रेसर असले तरी प्रसिद्धीपासून दूर होते असे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कमलाकर सावंत यांनी तर आभार प्रदर्शन नागेश स्वामी यांनी केले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## महात्मा बसवेश्वरमध्ये जेईई, नीट, एमएचटी–सीईटी संदर्भ ग्रंथ वितरण समारंभ संपन्न


लातूर :– महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसवेश्वर विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्यावतीने अकरावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांकरिता जेईई, नीट, एमएचटी–सीईटी या परीक्षा करिता आवश्यक असणाऱ्या संदर्भ ग्रंथाचा वितरण समारंभ श्री महात्मा बसेश्वर शिक्षण संस्थचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांच्या शुभहस्ते नुकताच संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारमांचावर उपप्राचार्य प्रा. संजय पवार, जेईई, नीट, एमएचटी–सीईटी समन्वयक प्रा. वनिता पाटील, बोर्ड समन्वयक डॉ. गुणवंत बिरादार, प्रा. संगमेश्वर पानगावे, प्रा. सतीश माळी, प्रा. गोविंद पांढरे, प्रा. नारायण गोरे, प्रा. केशव सूर्यवंशी, प्रा. नितीन वाणी, प्रा. यज्ञेश जनगावे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी नियमित व सतात्यापूर्ण पद्धतीने अभ्यास केला पाहिजे. आपणास आवश्यक तया सोईसुविधा पुरविण्याचा प्रयत्न महाविद्यालयामार्फत केला जाईल. आपल्या उज्वल यशामुळे आपल्या आई–वडिलांच व् महाविद्यालायचा नाव लौकिक होईल. तसेच अभ्यासात सातत्य व परिश्रम ही यशाची आहे, असे मत व्यक्त केले.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, महाविद्यालयाला गतवैभव प्राप्त करायचे असेल तर आपण सर्व विद्यार्थ्यांनी सातत्याने परिश्रम व कष्ट करणे अनिवार्य आहे.



या कार्यक्रमाला अकरावी विज्ञान शाखेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्तीत होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वनिता पाटील यांनी केले व आभार प्रा. यज्ञेश जनगावे यांनी मांडले.

## ७० वर्षीय महिलेचा खून करून मृतदेहासोबत चार दिवस बलात्कार

लातूर : मागच्या काही दिवसांपासून देशभरात बलात्कार आणि खूनाच्या घटनांमध्ये वाढ झाली असून चिमुकल्या मुली हैवानांच्या शिकार होत आहेत. आता वयस्कर महिलाही सुरक्षित नाहीत, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्याला हादरवून टाकणारी एक घटना लातूरमध्ये घडली आहे.



लातूरमधल्या एका गावात ७० वर्षीय महिलेवर बलात्कार करुन तिचा खून करण्याचा आला. एवढेच नाही तर ३१ वर्षीय आरोपीने तब्बल चार दिवस मृत महिलेवर बलात्कार केल्याचे कळत आहे. भादा, औसा आणि लातूर या तीन ठाण्याची पथक संबंधित गावामध्ये तपास करत आहेत. घटनेतील ३१ वर्षीय आरोपीचे नाव मन्सूर सादिक होगाडे असे आहे. मन्सूर हा शेतमजूर आहे. त्याच्या विचित्र स्वभावामुळे त्याची पत्नी त्याच्यासोबत राहत नव्हती. त्याची आईदेखील त्याच्या वागण्याला वैतागलेली होती असे सांगितले जात आहे. काही दिवसांपूर्वी मन्सूरची आई गावी गेली होती. त्याचा मन्सूरने फायदा उचलला. गावातून एक ७० वर्षीय महिला गायब होती. मन्सूरने त्या महिलेचे अपहरण केले, तिच्यावर बलात्कार करून तिची हत्या केली.

## लातुरात नाट्य स्पंदन प्रतिष्ठाण आयोजित 'सभ्य गृहस्थहो' नाटकाचे सादरीकरण माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्यासह खासदार डॉ.शिवाजी काळगे यांची उपस्थिती. नाट्य रसिक श्रोत्यांनी घेतला मनमुराद आनंद

वैद्यकीय क्षेत्रातील मंडळी दररोजच्या धावपळीच्या व्यस्थतेतून वेळ काढून नाट्यसंपदा प्रतिष्ठानच्या माध्यमातून जी सांस्कृतिक कलात्मकता जोपासत आहे, ही बाब अत्यंत कौतुकास्पद आणि अनुकरणीय अशीच आहे. लातूरकर रसिक प्रेक्षक या कलात्मकतेला उस्फूर्त दाद देत आहेत आणि देत राहतील हा विश्वास यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केला.



लातूर / प्रतिनिधी :– नाट्यस्पंदन प्रतिष्ठाण लातुरच्या वतीने वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर मंडळींचा सहभाग असलेल्या सभ्य गृहस्थहो नामक विनोदी दोन अंकी नाटकाचे रविवार दि. २५ ऑगस्ट रोजी सायंकाळी स्वर्गीय दगडोजीराव देशमुख स्मृती भवन या ठिकाणी आयोजन करण्यात आले होते. सभ्य ग्राहस्थहो या नाटिकेचा शुभारंभ माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे आणि मान्यवरांच्या हस्ते नटराज पूजन करून करण्यात आला. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख आणि उपस्थित सर्व मान्यवर, नाट्य रसिकांनी सदरील नाटकाचा मनमुराद आनंद घेतला. सभ्य ग्राहस्थहो या नाटिकेचे लेखन –जयवंत दळवी, दिग्दर्शक–डॉ.चंद्रकांत शिरोळे, सह दिग्दर्शक –डॉ.अभय ढगे आणि डॉ. मुकुंद भिसे, नेपथ्य – दत्तात्रय राऊत आणि डॉ. वेंकट येलाले, प्रकाश योजना–संजय आयचीत,संगीत – डॉ. अभय ढगे आणि दयानंद सरपाळे, रंगभूषा–भारत थोरात, प्रसिद्धी– डॉ. अनघा राजपूत आणि डॉ. वैशाली टेकाळे, रंगमंच व्यवस्था–गणेश पवार, नंदकुमार वाकडे, संदीप सहाणे तर या मधील कलाकार म्हणून डॉ. वेंकट येलाले, डॉ. मंजुषा कुलकर्णी, डॉ. भागवत शेळके, डॉ.शीतल टिके, डॉ.संजय मुंडकर, डॉ.शिल्पा दडगे, डॉ. अशोक आरदवाड, डॉ. अभिजित येलाले, डॉ.मुकुंद भिसे, डॉ. विनया बनशेळकिकर, डॉ. संदीप सहाणे, डॉ. अभय ढगे या वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी सादरीकरण केले ज्याचा रसिकांनी मनमुराद आनंद लुटला. दरम्यान यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते नाट्यस्पंदन प्रतिष्ठाण कडून खासदार डॉ. शिवाजी काळगे यांना मानपत्र देऊन तसेच प्रतिष्ठाणचे मानद सदस्यत्व देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी डॉ.चंद्रकांत शिरोळे, कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे, शहराध्यक्ष ड. किरण जाधव, ड. समद पटेल, सचिन बंडापल्ले, लक्ष्मण कांबळे, कैलास कांबळे, डॉ. ब्रिजमोहन झंवर, डॉ. अमित उटीकर यांच्यासह वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर मंडळी, नाट्य रसिक लातुरवासीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्रीडा दिनानिमित्त गुरुवारी विविध स्पर्धांचे आयोजन

लातूर :– महाराष्ट्रातील क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेमध्ये क्रीडा वातावरण निर्मिती करण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी मेजर ध्यानचंद (हॉकीचे खेळाडू) यांचा दिनांक २९ ऑगस्ट हा जन्मदिन क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. राज्यामध्ये क्रीडा व खेळाचा प्रचार व प्रचार व्हावा, शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत क्रीडा व खेळांचे महत्व पोहोचविणे, निरोगी राहण्याचा संदेश जावा, युवक – युवतीमध्ये क्रीडा विषयक वातावरण निर्माण व्हावे, क्रीडा संस्कृतीचे संवर्धन व जतन व्हावे यासाठी विविध उपक्रम राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात येणार आहेत. या निमित्ताने २९ ऑगस्ट रोजी १८ वर्षे ते ४० वर्षे वयोगटासाठी १०० मीटर धावणे, योगासन, कॅरम, बुध्दीबळ, आर्मरेसलींग, फन गेम. ४० वर्षे ते ६० वर्षे वयोगटासाठी ५० मीटर धावणे, ३०० मी. धावणे, १ कि.मी. चालणे, खो–खो, योगासन, बुध्दीबळ, पुशअप इ. ६० वर्षेवरील वयोगटासाठी ३०० मीटर जलद चालणे, योगासन, १ कि.मी. चालणे बुध्दीबळ इ. इयत्ता पहिली ते पाचवीसाठी ५० मी. धावणे , योगासन, लांबउडी, फनीगेम्स , इयत्ता सहावी ते आठवीसाठी ५० मी. धावणे, रिले , ३०० मी. धावणे, फुटबॉल, खो–खो, फनी गेम्स , इयत्ता नववी ते बारावी ५० मी. धावणे , रिले, ६०० मी. धावणे, फुटबॉल, खो–खो, पुशअप, सिटअप, फनी गेम्स आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमामध्ये लातूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडू , युवक – युवतींनी व नगारिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रिडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे (भ्रमणध्वनी क्र. ९९७५५७६६००) यांच्याशी संपर्क साधावा.

# जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर :– कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २८ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते ११ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE